REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 11 | AUGUST - 2021

मराठी चित्रपट: तंत्रज्ञ

कु. नम्रता देविदास ढाळे
संशोधक विद्यार्थीनी, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रस्तावना:—

चित्रपट कलेच्या विकासाच्या दृष्टीने पहिले प्रयत्न करण्याचे श्रेय डेव्हिड ग्रिफिश या दिग्दर्शकाकडे जाते. छायाचित्रण हा प्रकार व पूर्व दृश्यचित्रणाचे तंत्र त्यानेच प्रथम उपयोगात आणले. वेधांतरण, वेधसंक्रमण, दृश्यमिश्रण, उदयन अपायन, पार्श्वप्रेक्षपण, प्रतीक पध्दती, पार्श्वगायन इत्यादी तंत्राचा वापर केला. ॲल्फेड हिकॉकने अंडर कॅमिकार्न चित्रपटात वापरलेले टेन मिनिटस् टेक तंत्र डेव्हिड लिनन ऑलीव्हर टिवस्टमध्ये वापरलेले थॉट ऑन द स्क्रीन तंत्र यांनीही चित्रपटकलेच्या विकासास हातभार लावला. दृश्य स्पष्ट दिसावी म्हणून निरनिराळया रंगाची छानके वापरली जाऊ लावली. पुढे मराठी चित्रपटामध्ये हळूहळू सुरुवात झाली.

चित्रपटाची सुरुवात:—

चित्रपटाची सुरुवात १९१३ ला झाली. धुंडीराज गोविंद फाळके यांनी मुक चित्रपट 'राजा हरिशचंद्र प्रदर्शित केला नंतर १९३२ ला बोलपटाची सुरुवात झाली. त्यात 'अयोध्येचा राजा' हा पहिला चित्रपट होता. चित्रपटासाठी लागणारे तंत्रज्ञ ही फार मोठी भुमिका बजावते. चित्रपट करताना त्या पाठीमागच्या गोष्टीवर प्रकाश टाकला जाणे महत्वाचे आहे. सुरुवातीला हलत्या चित्राचे वेड लागले. हरिशचंद्र भाटवडेकर स्थिर चित्रणाचा व्यवसाय करीत होते. दादासाहेब इंग्लडला गेले. भाटवडेकर यांनी परदेशातून मुव्ही कॅमेरा मागवीला. दादासाहेबांनी तो कॅमेरा कसा वापरायचा तो शिकून घेतले. संबंधीत पुस्तके चित्राचे प्रयोग स्वत: करु लागले. बाबूराव पेंटरांनी तर यंत्राशी खेळणेच बनविले. मुकपटांच्या काळामध्येच बोलपटांचा काळ सुरु झाला. तंत्रज्ञ, कलावंत आकाराला आले. कंपनीचे जे पडेल ते कामे करण्यास सुरुवात केली. बाजारपेठेत जे स्टारपण आहे ते सर्व कंपनीला ब्रँड असे कौशल्य कमवित कंपनीतील नोकर कुणी कॅमेरामन, अभिनेता, दिग्दर्शक, लेखक, संकलन, संगीतकार, कलादिग्दर्शक, लेखक म्हणून उदयाला आले.

चित्रपट निर्मितीसाठी अनेक घटक लागतात. त्यामध्ये ध्वनिमुद्रक, संकलक, अभिनेते, अभिनेत्री, लेखक, कलादिग्दर्शक, छायालेखक, संगीतकार, इत्यादी घटक लागतात. कलेचा साधकही कलानिर्मिती करतो. चित्रपट हे तंत्रधिष्ठित माध्यम आहे. दृश्य पडद्यावर कसे चांगले दिसेल प्रेक्षकांवर त्यांचा परिणाम कसा आणि कुठल्याप्रकारे होईल हे दिग्दर्शकाला माहिती असते. पडद्यावर दृश्य चांगले दिसण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचे सहाय्य घ्यावे लागते. आणि लोकेशन ठरविणे. चित्रण करणे. चित्रित करण्यासाठी छायालेखक, छायाचित्रकार असतो संवादासाठी ध्वनीमुद्रक म्हणून दिग्दर्शकाला आपल्या संकल्पनेनुसार आपल्या संकल्पनेनुसार तंत्रज्ञाकडून करुन घ्यावे लागते. दिग्दर्शकाला 'कॅप्टन ऑफ द शिप' असे आरंभापासूनच म्हटले गेलेले आहे.

दादासाहेब फाळके आणि तांत्रिक महत्व:—

सुरुवातीला चित्रपटाची पटकथा करुन ती सेट तयार करुन रंगवून सुताराकडून ते व्यवस्थित लावून निरनिराळया पध्दतीने ते कसे दिसेल हे तपासून घेतले होते. दादासाहेब कलावतांची वेशभूषा ठरवित अभिनय शिकवण्यापासून त्यांनी सर्व कामे केली होती.

फाळके आपल्या चित्रपटाचे संकलन छायालेखन दिग्दर्शक, निर्माते, कलादिग्दर्शक होते. दादासाहेब यांनी चित्रपट निर्मितीची तांत्रिक बाजू भक्कम केली व तांत्रिक अंगाने महत्व आधोरेखित केले.

दादासाहेबांचा वारसा व चित्रपट निर्मिती:—

दादासाहेबांच्या वेळेस बाबूराव पेंटर यांचा उदय झाला. बाबूराव पेंटर स्वत: शिल्पकार, चित्रकार होते. ते महाराष्ट्र फिल्म कंपनीचे मालक होते. त्यांना चित्रपट तंत्रज्ञानाची सर्व माहिती होती. त्याचबरोबर शिष्यांनीही सहाय्यक म्हणून काम करता करता चित्रपटाचे तंत्र जाणून घेतले कंपनीतून बाहेर पडून प्रभात कंपनीची स्थापना केली. सितारामपंत कुलकर्णी चित्रपट निर्मितीसाठी पैसा कसा जमा करायचा ही जबाबदारी पार पाडली होती. व्ही शांताराम यांनी महाराष्ट्र फिल्म कंपनी सर्व कामे करत संकलन कौशल्य शिकून घेतले. विष्णूपंत दामले आणि केशवराव धायबर कॅमे—याने छायालेखन करण्याची जबाबदारी स्वीकारली. विष्णूपंत दामले, साहेबमामा फत्तेलाल हे दोघे कलादिग्दर्शक करु लागले. ध्वनिमुद्रणाचे तंत्र दादासाहेब तोरणे व बाबूराव पेंढारकर यांच्याकडून शिकून घेतले. दादासाहेब तोरणे यांनी ध्वनिमुद्रण, ऑडिओ कॅमेक्स मशीनची एजन्सी घेतली होती.

छायालेखाकाची नजर :—

बोलपटाच्या सुरूवातीला केशवराव धायबर इतर कंपन्यातून डी. जी. गुणे, एस. डी पाटील, राम व गजानन कांबळे, ए. पी. करंदीकर (१९०७) भाटवडेकर ऊर्फ सावेदादांकडून ल्युमिए कॅमेरा विकत घेऊन चित्रपट निर्मिती करणाऱ्या अनंतराव परशुराम करंदीकर, व्ही. पी. दिवेकर एस. एन.पाटणकर, व्ही. बी. जोशी, मधुसुदन हे छायालेखन करू लागले. १९३५ ला 'धर्मात्मा' चित्रपटापासून व्ही. शांताराम यांचे बंधू व्ही. अवधुत यांनी छायालेखनाची जबाबदारी प्रभात मध्ये सांभाळली. छायालेखनकारमधून अग्रगण्य होते. १९६३ छाया चित्रपटाचे पांडूरंग नाईक, १९३७ प्रेमवीर विनायकांचे धाकटे बंधू वासुदेव कर्नाटकी यांनी छायालेखन केले. नवयुग लि. ची स्थापना झाल्यावर पांडूरंग नाईक, वासुदेव कर्नाटकी हेच छायालेखक होते.

चाळीसीच्या दशकात बऱ्याच छायालेखकाचा उदय झालेला होता. आय. बारगीर, व्ही. बारगीर, के. जी. कोरगावकर, अनंत आगाशे, अरविंद लाड, दत्ता गोर्ले अनेक छायालेखकांचा उदय झाला. तर ऐंशीच्या दशकात शरद चव्हाण, प्रकाश शिंदे, देबु देवधर, चारूदत्त दुखडे इत्यादी.

नव्वदच्या दशकात थॉमस झेवियर, समीर आठवले, अनिल खांडेकर, नंदू पाटील, अकरम खान, व्ही. बाबासाहेब, संजय मेमाणे, उन्मेश कबरे, जाहिरात क्षेत्र कॉर्पोरेट उद्योगाचे क्षेत्र, दुरचित्रवाणीच्या वाहिन्या माहितीपट अशा अनेक छाया लेखक खुले झाले.

काळा बरोबर छायालेखनाचे तंत्र ही बदलले डेब्री, मिचेलसारख्या अगडबंब कॅमेऱ्या ऐवजी फिरमा डिजिटल मुव्ही कॅमेरा आलेला आहे. पण खर्चिकही बजेटचा परिणाम यंत्रतंत्राच्या वापरावर प्रदीर्घकाळ झालेला दिसतो. प्रतिभावंत कुशल व कल्पक दिग्दर्शकांनी तंत्रज्ञानी त्यावर अनेक वेळा मात केली. १९५९ चा 'सांगते एका', 'बुगडी माझी सांडली ग' या प्रसिद्ध गाण्याचे चित्रीकरण करताना दिग्दर्शक अनंत माने आणि छायालेखक ई. महंमद, यांनी क्रेनचा अभाव बैलगाडीचा वापर करून काढला होता. अडचणीवर मात करून चित्रपट काढला.

बजेटचा संकोच होऊ लागला त्यामुळे अर्थिक बजेट ही कोसळू लागले होते. मराठी चित्रपट ४० मि. मी ऐवजी १८ मि. मी फिल्मवर चित्रीत करून मग ४० मि. मी मध्ये ब्लो अप करण्याची प्रथाच पडुन गेली होती. दादा कोंडके व सचिन—महेश अशा दिग्दज अभिनेत्यानी अर्थिक साहय्य चित्रपटाला मिळवून दिले आज एकविसाव्या शतकात मराठी चित्रपटही चित्रीकरणात महागडे कॅमेरे जिमी झिपसारखी तंत्र सामग्री तसेच डिजिटल युगाने डी आय तंत्राचा वापर करू लागला आहे.

संकलकाची कल्पना:—

दादासाहेब फाळके यांनी चित्रपट तयार करण्यापूर्वी एक माहिती पटाची निर्मिती केली होती. चित्रपट निर्मितीच्या ज्या प्रक्रिया दाखविल्या होत्या. त्या अर्थातच त्या काळातील होत्या काळा बरोबर बदल ही होत गेलेला होता. चित्रपट खऱ्या आर्थाने जन्माला येतो. दिग्दर्शकाच्या मनात आणि पटकथाकाराच्या कागदावर तर संकलकाच्या टेबलावर फिल्मची लांबच लांब पट्टी असायची ते छायाचित्रकार पहायचे आणि ती पट्टी दिव्या जवळ धरून पहिली जात असे फिल्म हवी तिथे ठेवायचे नाही तिथे कापून एक प्रकारच्या द्रव्याने ते चिकटून टाकायचे फिल्म रसायनात धुण्याचे काम करायचे मुव्हीओला नंतर आधिक सुटसूटीत असे स्टीनबेक मशिन आले व संकलन काहीसे सोपे झाले. रश प्रिंटरचा वापर केला मुव्ही ओला किंवा स्टीनबेकवर ही रश प्रिंट आणि चित्रीकरणावेळी केलेल्या ध्वनीमुद्रणाची फित एकत्र चालवून संकलनाचे काम म्हणजे पटकथेनुसार दृश्यांची ओघवती, नाटयमय मांडणी करता येत असे. आजही संकलनाचे या पध्दतीने काम केले होते. मात्र मुव्हीओला संगणकावर उपलब्ध झालेल्या एव्हिड आणि एफसीपी या सॉफ्टवेअरच्या सहाय्याने करता येते. उदा. डिझॉल्व्हचे इफेक्टस्चे संकलनाच्या दरम्यान करता येवू शकतात. डाहयाभाई

पटेल किंवा त्यांच्यासारख्या अन्य तंत्रज्ञानांना स्पेशल इफेक्टसाठी बोलवण्यात येत असे. डिझीटल इंटरमिशने अपग्रेडिंग करुन चित्रपटांच्या दृश्य चकचकीतपणा दिला जातो. ध्वनिमुद्रण आणि पुर्नमुद्रण करण्यासाठी संगणकावर सुविधा उपलब्ध आहेत. ध्वनिचा परिणाम सहज जाणवता येतो. चित्रपट हा तंत्रधिष्टित माध्यम असल्यामुळे बदलत्या काळानुसार तंत्र त्यानुसार तांत्रिक साधन बदलणे आणि नवनविन येणे हे अपिहार्यच आहे. मराठी चित्रपट निर्मितीला वेगवेगळे तंत्र आज उपलब्ध झालेले आहे. बँकाचे कर्ज कॉर्पोरेट कंपन्याकडून मिळणारे अर्थ सहाय्य दूरचित्रवाणी वाहिन्याद्वारे मिळणा–या निर्मितीची जबाबदारी यातून अर्थसहाय्य होवू लागले.

व्ही. शांतारामाच्या प्रभात कंपनीत माधव शिंदे, आनंत माने, कुशल संकलक तयार झाले. शांतारामा व्यतिरिक्त अनेक संकलक निर्माण झाले होते. गुरुदत्त शिराळी हे मराठीतच नव्हेतर हिंदी चित्रपट सृष्टीतही कुशल संकलक होते. भानूदास दिवेकर यांची कारर्कीद सुरु झाली तेव्हा १९६१ मध्ये 'प्रपंच' या पहिल्या महाराष्ट्र राज्य पुरस्कार विजेता व मधुकर पाठक यांनी दिग्दर्शक केलेल्या चित्रपटाने तंत्रज्ञानाचे उत्तम सहाय्यक लाभल्यामुळे सत्तर ते ऐंशीच्या दशकामध्ये तंत्रज्ञ प्रशिक्षण घेवू लागले होते. त्यामुळे नविन संकलक ही सामील झाले होते. स्वत: सचिनने 'आमच्यासारखे आम्ही', या चित्रपटाचे संकलनाची जबाबदारी सांभाळली. हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले बरेच संकलक हे मराठी भाषिक होते त्यापैकी वामन गुरु, एम.एस.शिंदे, भानुदास दिवकर, अरुण गोगटे, वसंत बोरकर, जी.जी.मयेकर, प्रभाकर कारखानीस इत्यादी.

बोलपटाचे सामर्थ्य:–

बोलपट काढायचे ठरताना ध्वनीमुद्रणाचे नवे तंत्र विष्णूपंत दामले यांनी दादासाहेब तोरणे व बाबूराव पेंढारकर यांच्याकडून शिकून घेतल्याचे उल्लेख आहे. दादासाहेब तोरणे यांनी ऑडिओ कॅमेक्स प्रभात कंपनीला पुरविले. तोरणे यांनी ध्वनीमुद्रणाचे तंत्र सर्वप्रथम विकत घेतले. मंगेश देसाई पुर्नध्वनीमुद्रणाच्या क्षेत्रात फार मोठा लौकिक प्राप्त केला. सत्यजित रॉय चित्रपटाला पुर्नध्वनीमुद्रणासाठी मंगेश देसाई यांच्याकडे स्वत: घेवून येत.

निष्कर्ष:–

तंत्रज्ञानाशिवाय चित्रपट होवू शकत नाही. आरंभेच्या काळात चित्रपट तंत्रधिष्ठित माध्यम असून तांत्रिक आघाडीवर प्रगत झालेले आज दिसून येते. कारण चित्रपटातील तंत्रज्ञ हा मोठा भाग बनला आहे. व्यवसायिक मूल्य तसेच कलात्मक मूल्य देखील जोपासण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करुन घेणे आवश्यक ठरते. बदलत्या काळानुसार संगणक, मोठया प्रमाणात उपयोगी पडतो. व संगणकामुळे ब–याच गोष्टीचा उलगडा होवू लागतो. चित्रपटातील सर्व तंत्रज्ञानांनी नव्या पिढीचा सारा बदल पुढे तसेच वाटचाल करत आहे.

संदर्भ ग्रंथ

१) चित्रपट
२) देशपांडे रेखा, मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास, सचिव: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई
३) मुजावर इसाक, दादासाहेब फाळके, साधना प्रकाशन, पुणे
४) मोशाय बाबू, चित्राची गोष्ट, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई
५) मराठी विश्वकोष, खंड ५